Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# ''मध्ययुगीन शिक्षण — दिशा व दशा''

**प्रा. राजेश हिरालाल घोडेस्वार**
इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर, जि.नागपूर

## प्रस्तावना—

भारतात आठव्या शतकापर्यंत इस्लाम धर्माचा प्रसार भारतात बराच प्रसार झालेला होता. महंमद घोरीने उत्तर भारतात मुस्लिम राजवटीचा पाया घातला तर कुतूबूद्दीन ऐबकाने भारतात मुस्लिम राजवटीची सुरुवात केली. भारतात इ.स. १२०६ ते १८५८ या कालखंडात मुस्लिम राजवट होती. सुमारे ६५० वर्ष राज्य करुन गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी आणि मोगल घराण्यांनी भारताच्या राजकिय, सामाजिक, सांस्कृतीक व शैक्षणिक इतिहासावर आपल्या चांगल्या वाईट कर्तृत्वाची छाप पाडली. मुस्लिम राजवटीतील धर्मांधता, हिंदूव्देष, आक्रमकता व संकुचितपणा यामुळे सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भारताची बरीच पिछेहाट झाली. त्याबरोबरच काही वैशिष्टयपूर्ण बाबीही घडून आल्यात. कलेच्या विकासाला चालना मिळाली. नविन शिक्षणप्रणाली उदयास आली. तिला मध्ययुगीन शिक्षण प्रणाली असे म्हणतात.

## विषय प्रवेश—

भारतातील मुस्लिम राजवटीचा संस्थापक कुतूबूद्दीन ऐबक होय. त्याने प्रथम मुसलमान लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. तो अतिशय विद्वान होता. त्याच्या केवळ चार वर्षाच्या कारकिर्दीत त्याने अनेक मक्ताब व मदरसे आणि मशिदी बांधून शिक्षणाचा प्रसार केला. त्याने बौध्द विहार व मंदिरे यांचा विध्वंस करुन मशिदी आणि मदरसांची निर्मिती केली.

अल्तमश हा शिक्षणप्रेमी शासक होता. त्याने दिल्लीत मदरसा बांधून त्यातुन अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. रझिया सुल्ताना ही कुराणाची चांगलीच जाणकार होती. तिच्या काळात 'मुईझझी मदरसा' ही एक फार मोठी मुस्लिम शिक्षणसंस्था निर्माण झाली. सुल्तान नसिरुद्दीनने अनेक हुशार विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. त्याने पंजाब व जालंधर या ठिकाणी दोन महाविद्यालये स्थापन केल्याचे उल्लेख आढळतात. सुल्तान नासिरुद्दीन याने पवित्र कुराणाची नक्कल केली. त्याच्या दरबारातील विद्वानांचा तो आदर करित असे. त्याच्या काळात फारशी भाषा विकसीत झाली. त्याच्या राज्यात अनेक पुस्तकांचे लिखाण झाले. 'तबकाते नासिरी' हे ऐतिहासिक दस्तऐवजाचे पुस्तक त्यापैकीच एक होय. बल्बन ने अनेक विद्वान व बुद्धीवंतांना राजाश्रय दिला. त्याच्या दरबारात आमिर खुसरो हा प्रतिभाशाली विद्वान होता. त्याच्या २० वर्षाच्या राजवटीत संस्कृती आणि वाङ्मयाला बरेच प्रोत्साहन मिळाले. बल्बनचा पूत्र सुल्तान महंमद योन सर्वप्रथम वाङमय मंडळाची स्थापना केली. तो तत्वज्ञानाच्या चर्चेत भाग घेत असे. महंमदाच्या काळात शिक्षणाबरोबरच वाङ्मय निर्मितीलाही चालना मिळाली

जलालुद्दीन खिलजी हा खिलजी साम्राज्याचा संस्थापक होय. शिक्षणप्रेमी असल्याने त्याने अनेक विद्वानांना प्रोत्साहित केले व त्यांचा आदर केला. त्यामुळे नवसाहित्य निर्मितीला बहार आली. सुल्तन जलालुद्दीन खिलजीने दिल्लीजवळ किलगुरी येथे एक ग्रंथालय स्थापन केले. त्या ग्रंथालयाचा प्रमुख आमीर खुसरो होता. अल्लाउद्दीन खिलजी हा निर्दयी व जुलमी सुल्तान होता. त्याला शिक्षणाबद्दल आदर नव्हता. त्याने सुरु असलेल्या अनेक शैक्षणिक संस्था बंद केल्या होत्या. त्यामुळे काळात शिक्षणाची पिछेहाट झाली.

तुघलक घराण्याचा संस्थापक गयासुद्दीन तुघलक हा मोठा शिक्षणप्रेमी होता. त्याने विद्वानांची कदर केली. त्याने सांस्कृतीक सभा स्थापना करुन अनेक विद्वानांना बक्षिसे दिली. महंमद तुघलक हा सुध्दा शिक्षणप्रेमी होता. तो स्वतः लेखक होता. त्याला वैद्यकशास्त्र, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, इत्यादींचे ज्ञान होते. तत्वज्ञानातील अनेक ग्रंथाचे त्याने वाचन केलेले होते. अनेक विद्वानांना राजसभेत बोलावून तो वादविवाद घडवून आणत असे. त्याने विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतने सुरु केली. अनेक नविन मक्तबांची स्थापना केली. त्याच्या दरबारात अनेक विद्वान, लेखक, कलाकार, तत्ववेत्ते होते. यापुर्वीच्या कोणत्याही सुलतानाच्या दरबारात विद्वानांची एवढी मोठी संख्या नव्हती. दुरदुरहून विद्वान त्यांच्याकडे येत असत. फिरोज तुघलक हा स्वतः शिक्षणप्रेमी व विद्वान शासक होता. त्याने शिक्षण क्षेत्रात लक्षणीय प्रगती घडवून आणली. त्याचे नाव भारतातील मुस्लिम शिक्षणाच्या प्रगतीसाठी सुवर्णाक्षरांनी नोंदविले गेले. त्याच्या काळात दिल्ली हे शिक्षणाचे केंद्र बनले. वाङ्मय, इतिहास आणि कला यांना त्याने उत्तेजन दिले. त्याने केवळ शिक्षण संस्थाना आर्थिक मदतच केली असे नाही तर तीस वस्तीगृहात्मक शैक्षणिक संस्थाही स्थापन केल्या. गुलाम मुलांसाठी त्याने शिक्षकांची नियुक्ती केली. शिक्षण हे पुर्णपणेराज्याची जबाबदारी आहे असे त्याचे मत होते. त्याने अनेक संस्कृत ग्रंथाचा फारशी भाषेत अनुवाद केला. हिंदू धर्माविषयी त्याची वृत्ती सहिष्णूवादी होती. त्याच्या काळात शिक्षणातून केवळ ज्ञानदानाचे कार्य होत नव्हते, तर इस्लाम धर्माला पोषक असे प्रात्यक्षिकही करुन घेतले जात होते. त्याच्या ३८ वर्षाच्या राज्यकारभारात त्याने अनेक मक्ताब व मदरसे बांधले. तो गरीब विद्यार्थ्यांना विद्यावेतन देत असे. फिरोजाबाद मध्ये त्याने एक मोठी मक्ताब बांधली.

भारतात मुघल साम्राज्याचा पाया घालणारा सम्राट बाबर होय. अरबी, तुर्की आणि फारशी साहित्यातील थोर विद्वान म्हणून त्याची ख्याती होती. त्याला स्वतःला शिक्षणाची आवड व प्रेम होते. त्याने शोहरती ई—आम या संस्थेची स्थापना केली. वाङमय, कला आणि कलाकारांचा तो भोक्ता होता. त्या काळातील विद्वान गयासुद्दीन, महंमद खुदागीर आणि मौलाना शहाबुद्दीन हे बाबराचे चांगले मित्र होते. बाबराने तुझूकए बाबरी (बाबरनामा) हे आत्मचरित्र लिहिले. बाबराने शिक्षणाच्या प्रसाराकरीता काही मक्ताब व मदरसे स्थापना केले होते.

हुमायुनला कवी, तत्त्वज्ञ यांच्या सहवासात राहायला आवडत असे. त्याने दिल्ली येथे भव्य अशी शैक्षणिक संस्था निर्माण करून त्याचे प्रमुखपद शेख हुसैन यांना बहाल केले. हुमायुनने अनेक मदरसे व मक्ताब निर्माण केले. तो जेव्हा जेव्हा बाहेर जाई त्या वेळी त्याच्या बरोबर पुस्तकांचा संग्रह असे. त्याने विद्वान व बुद्धीमान व्यक्तीसाठी अतिथीगृहे बांधली. हुमायुनने खगोल व भुगोलाच्या अध्ययनासाठी महाविद्यालये सुरू केली होती. भारताच्या इतिहासात सम्राट अकबराची कारकीर्द प्रशासनाच्या बाबतीच नव्हे तर शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्याच्या योगदानाबद्दल उल्लेखनिय ठरली. तो स्वतः निरक्षर असला तरी शिक्षण प्रसाराची अतिशय आवड होती. शिक्षण, कला, वाङमय, तत्त्वज्ञान आणि इतिहास या क्षेत्रांच्या विकासासाठी त्याने विशेष प्रयत्न केले. त्यासाठी त्याने विशेष धोरणे आखली होती. धार्मिक शिक्षण देतांना हिंदूना स्वातंत्र्य दिले. त्यामुळे साहित्य, संगीत, चित्रकला, गणित यांसारख्या विषयांचे शिक्षण सुरू झाले. त्याच्या काळात व्यावसायिक शिक्षणाला चालना मिळाली. अकबराने अनेक महाविद्यालये स्थापन केली. त्याच्या काळात त्याने एक मोठे वाचनालय

निर्माण केले. संस्कृत ग्रंथाचे त्याने फारशी भाषेत भाषांतर केले. हिंदू आणि मुस्लिम मुले एकत्र शिक्षण घेत होती. अकबराने फक्त मुस्लिम शिक्षणाची मक्तेदारी राहू न देता त्याला हिंदू शिक्षणाची जोड त्याने दिली. म्हणूनच मुस्लिम मुले कुराण ग्रंथाचा तर हिंदू मुले व्याकरण, वेद, योगपातंजली यांसारख्या विषयांचा अभ्यास करीत असत. अकबराने आपल्या विद्वानांना आदर आणि सम्मान दिला. अकबराने एकाचवेळी हिंदू आणि मुस्लिम साहित्याचा, कलांचा, वाङमयाचा आदर करून त्यांना उत्तेजन दिले.

जहागिर स्वत: विद्वान होता. त्याला कला आणि साहित्याविषयी प्रेम होते. त्याने मक्ताब व मदरसे स्थापन केले. 'जहांगीर नामा' हा ग्रंथ त्याने लिहिला. एखाद्या धनिकाच्या मृत्यूनंतर त्याची संपत्ती तो राजदरबारी जमा न करता मदरसांच्या विकासासाठी खर्च करीत असे. जहांगीरने अनेक कलाकार, संगितकार, कवी यांना आश्रय देवून त्यांच्या कला विकासनासाठी मदत केली.

सम्राट शहाजहानला भव्य, विशाल इमारती बांधण्याचा शौक होता. तरीसुद्धा त्याच्या काळात शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले नाही. बुद्धीमान व विद्ववान लोकांसाठी तसेच कवींसाठी त्याने बक्षिसे, शिष्यवृत्त्या सुरू केल्या. इ. स. १६५० मध्ये दिल्ली येथे जामा मशिदीजवळ मदरसा स्थापना केला. तेच आज इंपिरियल महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. तसेच 'दर—उल—बाग' या महाविद्यालयाची त्याने डागडूजी केली. त्याची मुलगी जहांआराहिने आग्रा येथे जामा मशिदीजवळ एक मदरसा सुरू केला. त्याचा मुलगा दाराशिकोव सुद्धा ज्ञानप्रेमी होता. त्याने फारशी, अरेबिक, संस्कृत या भाषांचे अध्ययन केले होते. अनेक संस्कृत ग्रंथाची त्याने भाषांतरे केली होती. शहाजहानच्या काळात कला, साहित्य, शिक्षण आणि संस्कृती यांचा विकास झाला. औरंगजेब हा निर्दयी आणि संकुचित विचारांचा धर्मांध राज्यकर्ता होता. शिक्षणाच्या माध्यमातून इस्लामचा प्रसार करणे हे त्याचे प्रमुख ध्येय होते. त्याच्या कारकिर्दीत अनेक हिंदूची पवित्र मंदिरे व पाठशाळा यांचा विध्वंस करून त्याजागी मशिदी, मक्ताब आणि मदरसांची निर्मिती केली. यावरून तो हिंदूधर्म, हिंदू शिक्षण यांच्या विरोधात असल्याचे जानवते. औरंगजेबाने मुस्लिम शिक्षणाला प्रोत्साहन देवून त्याचा प्रचार व प्रसार केला. मुस्लिम विद्वानांचा तो पुरस्कर्ता होता. त्यांच्यासाठी त्याने बक्षिसे व शिष्यवृत्या सुरू केल्या. त्यांच्या काळात अनेक मक्ताब व मदरसे निर्माण झालेत. सम्राट औरंगजेब हा प्रचलित शिक्षण पद्धतीवर नाखूष होता. कारण या शिक्षणात जीवन, जीवनाला आवश्यक गोष्टी, विचार करण्याची पात्रता यांचा अभाव आढळत होता. त्यांच्या मते मातृभाषा आणि चारित्र्य यावर लक्ष दिले गेले नाही. त्याचप्रमाणे हे शिक्षण जिवनाशी सुसंगत नाही. शिक्षणप्रक्रिया समाजाभिमुख असणे गरजेचे वाटल्याने औरंगजेबाने अभ्यासक्रमात मुलभूत बदल केला. इतिहास, भूगोल आणि भाषा याबरोबरच विविध कला, चांगल्या सवयी, चारित्र्यनिर्मिती या सर्वांचा समावेश असणारा अभ्यासक्रम त्याने तयार केला. त्याने अनेक वाचनालयांची निर्मिती केली. अहमदनगर, सियालकोट, गुजरात या ठिकाणी अनेक मदरसे, मक्ताब यांची त्याने स्थापना केली. त्याने मातृभाषेला अधिक प्राधान्य दिले.

**निष्कर्ष :—**

१. राज्यकर्ते इस्लाम धर्मिय असल्याने शिक्षणाच्या माध्यमातून इस्लामी संस्कृतीचा प्रसार व प्रचार करण्याला त्यांनी प्राधान्य दिले.
२. सल्तनत काळात महंमद तुघलक व फिरोज तुघलक आणि मुघल काळात सम्राट अकबर यांनी शिक्षणाच्या विकासाला बराच हातभार लावला.
३. अल्तमश, महंमद तुघलक, अकबर व शहाजहान या शासकांना शिक्षणाबद्दल निरतिशय प्रेम होते. त्यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांसाठी शिक्षणाच्या जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून दिला.

४. मध्ययुगीन काळात हिंदू शिक्षणाचा व संस्कृतीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास घडून आला. काही उदारमतवादी राज्यकर्त्यांनी हिंदू शिक्षणाला प्रोत्साहन दिले असले तरी राजाश्रय नाममात्रच होता. त्यामुळे या काळात हिंदू शिक्षणाचा व संस्कृतीचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास घडून आला.
५. सम्राट औरंगजेब कट्टर धर्माभिमानी असला व हिंदू शिक्षणाचा विरोधक असला तरी त्यांचे शिक्षण विषयक धोरण सर्व शासकांमध्ये पुरोगामी स्वरूपाचे आढळून येते.

**संदर्भ**


१. शर्मा, एस. पी. भारत का इतिहास, लक्ष्मीनारायण अग्रवाल, आग्रा, प्रथम संस्करण, १९९१
२. देशमुख, प्रा. एल. जी. – भारतातील शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००४
३. कोलारकर, डॉ. श. गो. – भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९५
४. मध्यकालीन भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २००४
५. जोशी, गणेश नारायण – हिंदुस्तानचा संपूर्ण इतिहास, शुभदा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९५९
६. जाधव, डॉ. मोहन आणि इतर – भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००३